डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
**प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग**

दूर. क्र.०२३६६ –२६२२३४, E-mail-adrfruitsvengurla@gmail.com

जा.क्र.प्राफसंके/वेंगुर्ले/चांतेबा/ 5475 /२०१९ दिनांकः– १८/१२/२०१९

## जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विस्तार शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त चांदा ते बांदा या योजनेअंतर्गत **"भात पिकाच्या यांत्रिकीकरणाकरीता अन्न सुरक्षादल स्थापन करणे"** ही योजना सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये राबविली जात आहे. या योजनेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे पदे भरण्यासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह पात्र उमेदवारांकडून दिनांक ०२/०१/२०२० पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. **तसेच उमेदवार हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रहिवाशी असावा.**

| अ. क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | पारिश्रमिक मानधन (रू.) | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | अन्न सुरक्षा दल सदस्य | ५० | रू. २३०/– प्रती दिन | ११ महिने |

पात्रता:–

| | |
|---|---|
| १. अन्न सुरक्षा दल सदस्य | इयत्ता ४ थी पास, शेतीमध्ये काम करण्याचा अनुभव असणे आवश्यक, **यंत्रसामुग्रीविषयी ज्ञान असल्यास प्राधान्य** |

**नियम व अटी :**

१. अर्जदाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती भरून सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला–४१६५१६ जि. सिंधुदुर्ग अथवा कृषिविद्यावेत्ता, कृषि संशोधन केंद्र, फोंडाघाट– ४१६६०१ यांचे नावाने अर्ज त्यांचे कार्यालयात दि. **०२/०१/२०२०** रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत किंवा तत्पुर्वी पाहोचतील अशाप्रकारे पाठवावेत.

२. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

३. उमेदवारांच्या **मुलाखती दि. ०६/०१/२०२० रोजी सकाळी ९.०० वाजता प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे घेण्यात येतील.**

४. मुलाखतीला येताना अर्जा सोबत जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती आणाव्या लागतील.

५. वयाची मर्यादा :– १८ ते ४० वर्षे

६. कोणत्याही टपालाव्दारे उशिरा अर्ज प्राप्त झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

७. अर्जाच्या लखोटयावर **"अन्न सुरक्षा दल सदस्य"** या पदासाठी अर्ज असा ठळक उल्लेख करावा.

८. पात्र उमेदवारांची निवडसमितीव्द्वारे मुलाखत घेण्यात येईल.

९. मुलाखतीला आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

१० निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

११ निवड झालेल्या उमेदवाराला रू. २००/— किमतीच्या बॉड पेपरवर नियुक्त केलेल्या कालावधीत नोकरी सोडून जाता येणार नाही असे लिहून दयावे लागेल.

१२ निवडलेल्या उमेदवाराला विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतर्गत ज्या ठिकाणी योजना चालू आहे त्या ठिकाणी ठेवले जाईल.

१३ नियुक्त केलेल्या उमेदवाराचे काम असमाधानकारक अथवा गैरवागणुकीचे आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या पुर्वी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.

१४ उमेदवाराला नोकरी सोडावयाची असल्यास त्याने एक महिना पुर्वी लेखी कळविण्यात यावे. तसे न केल्यास त्याचे एक महिन्याचे वेतन कापून घेण्यात येईल.

१५ निवड झालेल्या उमेदवाराला डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या कार्यालयात कायमस्वरूपी नोकरी मिळण्यासाठी कोणताही हक्क राहणार नाही.

१६ विद्यापीठास कोणतेही कारण न सांगता त्याच्या इच्छेनुसार एक किंवा सर्व अर्ज नाकारण्याचा अधिकार आहे.

१७ या जाहीरातीमध्ये देण्यात आलेले पारीश्रमिक मानधन विद्यापीठाच्या निर्णयानुसार बदलू शकते किंवा भविष्यात मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत होवू शकेल.

१८ उमेदवाराला देण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती आणि मानधन प्रकल्प संपल्यानंतर आपोआपच रद्द होईल.

**सहयोगी संशोधन संचालक**
**प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले**
**तथा**
**प्रकल्प प्रमुख, चांदा ते बांदा योजना (FSA)**

**प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी—**

प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना रवाना.

२/— त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यात यावी.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

## प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग

**चांदा ते बांदा योजनेअतंर्गत –भात पिकाच्या यांत्रिकीकरणाकरीता अन्न सुरक्षा दल स्थापन करणे**

### अर्जाचा नमुना

| उमेदवाराचे रंगीत छायाचित्र |
|---|

पदाचे नाव—

जाहिरात क्र. तारीख —

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | : | |
| 2 | दुरध्वनी क्र./भ्रमणध्वनी क्र. | : | |
| 3 | राष्ट्रीयत्व | : | |
| 4 | कायमचा पत्ता | : | |
| 5 | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | |
| 6 | कामाचे ठिकाण (ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे कामाचे ठिकाण) | | |
| 7 | जन्मतारीख (आकडयामध्ये आणि अक्षरी) | | |
| 8 | वय (अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी) | | |
| 9 | धर्म आणि पोटजात | | |
| 10 | संवर्ग— एस.सी, एस.टी, एन.टी, डी.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, इ. | | |
| 11 | वैवाहिक स्थिती | | विवाहित/अविवाहित |

12. शैक्षणिक अर्हता—

| पदवी/परिक्षा | शैक्षणिक मंडळ/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी | प्राप्त गुण (टक्केवारी) | शाखा/विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

13. कामाचा अनुभव

| नियोक्त्याचे नाव आणि पत्ता | पद आणि कर्तव्य | वेतनमान | कर्तव्याचा कालावधी | | एकूण कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |

14. संलग्न कागदपत्रांची यादी

1.
2.
3.

15. घोषणा—

मी याव्दारे असे घोषित करतो/करते की वरील सर्व माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे आणि समजुतीनुसार खरी आहे. मी हे देखील घोषित करतो/करते की मला सरकारी सेवा आणि सुविधांपासून कधीही वगळण्यात आलेले नाही. कोणत्याही गुन्हयाबद्दल कोर्टाने मला दोषी ठरविलेले नाही. कोणतीही माहिती चुकीची असल्यास अथवा आढळल्यास किंवा मुलाखतीच्या आधी किंवा मुलाखतीनंतर किंवा नेमणूकीनंतर केव्हाही अपात्र आढळल्यास माझ्यावर कायदेशीर कारवाई होवू शकते याची मला जाणीव आहे. कार्यालयाचे निर्णय माझ्यावर बंधनकारक राहतील व मी प्रामाणिकपणे आणि योजनेच्या आवश्यकतेनुसार काम करेन.

तारीख:

सही/—

नाव

टिप— प्रमाणपत्र आणि कागदपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात.